सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City
goodeveningcity@gmail.com
१६ सप्टेंबर २०२५, मंगळवार | वर्ष १४ वे | अंक १४३ | पृष्ठे ६

# खडकपूर्णा प्रकल्पाचे १९ दरवाजे उघडले!



**देऊळगाव राजा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून व आज सकाळ पासून पावसाचा जोर वाढला आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या खडकपूर्णा प्रकल्प ओव्हर फ्लो झाला प्रकल्पाची सर्वच १९ गेट उघडण्यात आली आहेत. ही सर्व गेट ५० सेमीने उघडण्यात आली आहे. त्यामुळे, खडकपूर्णा नदीच्या काठावर असलेल्या ३३ गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान मेहकर तालुक्यातील पेन टाकळी प्रकल्पही तुडुंब भरला आहे. या प्रकल्पाचे पाच गेट २० सेमीने उघडण्यात आले आहेत. जिल्ह्यात सिंचनासह पाणीपुरवठा योजनेसाठी महत्वाचे असलेल्या संत चोखासागर प्रकल्पाच्या क्षेत्रात जोरदार पाउस झाला आहे. त्यामुळे, प्रकल्पाच्या जलसाठ्यात वाढ झाली आहे. सध्या प्रकल्प १०० टक्के भरला आहे. या प्रकल्पाचा प्रकल्पीय संचयीत साठा ९३.४० दलघमी आहे व पूर्ण संचय पातळी ५२०.५० मीटर आहे. प्रकल्पात सद्यस्थितीत ५२९ मीटर जलाशय पातळी आहे. प्रकल्पाचे पाणी प्रकल्प शेजारील गावात शिरू शकते, त्यामुळे सर्व म्हणजे १९दरवाजे ५० सेंटीमीटरने उघडण्यात आले असून नदीपात्रात पाणी सोडले आहे. त्यामुळे खडकपूर्ण नदीला पूर आहे. सध्या नदीपात्रात १३२६ घन सेमी, ४६ हजार ८५४ घन फूट सेमी पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. प्रकल्पाच्या क्षेत्रात आणखी पाउस झाल्यास प्रकल्पातून विसर्ग वाढवण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील या गावांना दिला सतर्कतेचा इशारा

नदीकाठावरील गावापैकी देऊळगाव राजा तालुक्यातील निमगाव गुरु, सावंगी टेकाळे, डिग्रस बुद्रुक, डिग्रस खुर्द, टाकरखेड वायाळ, टाकरखेड भागिले, सिंदखेड राजा तालुक्यातील निमगाव वायाळ, साठेगाव, हिवरखेड, राहेरी खुर्द, तडेगाव, राहेरी बुद्रुक, ताडशिवणी, देवखेड, पिंपळगाव कुंडा, लिंगा आणि लोणार तालुक्यातील खा-परखेडा, रायगाव व सावरगाव तेली गावाना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी खबरदार घ्यावी असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. सिंदखेड राजा तालुक्यात काल ढगफुटीसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. आज दुपारनंतर पावसाचा जोर ओसरला होता.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लांबणीवर



**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर (वृत्तसंस्था) :** महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात आज महत्त्वाची सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला ३१ जानेवारी २०२६ पूर्वी सर्व जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच निवडणूक आयोगाला नोव्हेंबर २०२५ पर्यंत ईव्हीएम मशीन उपलब्ध करून द्याव्यात, अशाही सूचना देण्यात आल्या. गेल्या काही वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता या निवडणुकांना गती मिळणार आहे. न्यायालयाने दिलेल्या मुदतीनुसार, सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला ठराविक वेळेत निवडणूक प्रक्रिया पार पाडावीच लागणार आहे.

मे महिन्यात झालेल्या सुनावणी वेळी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र सरकारला चार महिन्यांत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. त्याशिवाय जर ते शक्य नसेल, तर वेळ वाढवून घेण्यासाठी आमच्याकडे यावे लागेल, असे सुप्रीम कोर्टाने म्हटले होते. त्यानंतर निवडणुकीच्या दृष्टीने तयारी सुरू झाली. अनेक महापालिकांमधील प्रभाग रचना जारी करण्यात आली. जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यानंतर आज राज्य आयोगाने सुप्रीम कोर्टात आज अर्ज दाखल करत आम्हाला जानेवारी २०२६ पर्यंत मुदत वाढवून द्यावी, असा अर्ज राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात केला होता. या अर्जावर आज सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने आयोगाला सप्टेंबरपासून जानेवारीपर्यंत एवढा मोठा अवधी का हवा? अशी विचारणा केली. यावर ईव्हीएम मशीनची उपलब्धता नसणे, आगामी काळातील सण-उत्सव, विद्यार्थ्यांच्या परीक्षा आणि कर्मचाऱ्यांची कमतरता, अशी कारणे आयोगाच्या वतीने देण्यात आली. निवडणूक आयोगाने मांडलेल्या कारणांचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ देत असल्याचे सांगितले. त्यामुळे आता जानेवारी २०२६ अखेरपर्यंत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे बंधनकारक ठरणार आहे.

दरम्यान, ओबीसी आरक्षणामुळे यावर्षी निवडणुका होऊ शकल्या नाहीत. आम्हाला अपेक्षित होत की चार महिन्यांत निवडणुका व्हाव्यात. आम्हाला वाटत होते की, या महिन्याच्या शेवटी निवडणुका होतील. आज प्रकरण सुनावणीसाठी आल्यावर राज्य निवडणूक आयोग अर्ज करतेय की, आणखी निवडणुका पुढे ढकला. निवडणुका आणखी सूचीबद्ध झाल्या नाहीत. त्या व्हायला पाहिजे होत्या, अशी स्पष्ट नाराजी सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली. दरम्यान, ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व प्रकारच्या निवडणुका पार पडल्या पाहिजेत. तसेच राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या ज्या मागण्या असतील त्यासंदर्भात राज्य सरकारकडे पाठपुरावा करावा असे सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ देताना स्पष्ट केले आहे. ईव्हीएमची मागणी, कर्मचाऱ्यांची मागणी यासंदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवा. सर्व मागण्या कशा पूर्ण करता येतील, कामाचे टप्पे कसे असतील यासंदर्भात न्यायालयाने आयोगाला वेळापत्रक दिले असल्याचे कोर्ट म्हणाले.

# ब्रिटनमध्ये लोकांमध्ये संताप; निर्वासितांना लष्करी तळांवर ठेवणार

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर (वृत्तसंस्था) :** ब्रिटिश कोस्ट गार्ड व पेट्रोलिंग टीम इंग्लिश चॅनलवर घुसखोरांची बोट पकडताच हँडलरच्या सूचनेनुसार ते आत्मसमर्पण करतात. या सर्व घुसखोरांना गृह मंत्रालयाच्या पहिल्या न्यायाधिकरण न्यायालयासमोर हजर होतात. कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर घुसखोरांना बेकायदेशीर निर्वासितांचा दर्जा मिळतो. बेकायदेशीर निर्वासितांना हॉटेल, वसतिगृहे किंवा इतर ठिकाणी ठेवले जाते. त्यांना मोफत जेवण आणि राहण्याची सुविधा मिळते. न्यायाधिकरणाची सुनावणी ४ ते ५ वर्षे चालते. या काळात बेकायदेशीर निर्वासित मॉल, दुकाने आणि कार वॉश स्टेशनवर रोख रकमेचे काम सुरू करतात. ब्रिटनमध्ये कामगार वेतन प्रति तास १५०० रुपये आहे, परंतु निर्वासित १००० रुपयांना काम करण्यास सहमत आहेत. याचा अर्थ ते दररोज ८ हजार कमवतात. पाच वर्षांच्या सुनावणीनंतर सरासरी ७०% बेकायदेशीर निर्वासितांना कायदेशीर आश्रय मिळतो. उर्वरित लोकही ब्रिटनमध्ये राहण्याचा प्रयत्न करतात. ब्रिटनमध्ये मानवी तस्करी करणाऱ्या टोळ्या भारतातील काही शहरांमध्येही सक्रिय आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या टोळ्या प्रतिव्यक्ती ३५ लाख रुपयांपर्यंत शुल्क आकारतात. ब्रिटनमध्ये प्रवेश करण्यासाठी इंग्लिश चॅनल हा सर्वात मोठा मार्ग आहे. लोकांना येथे बोटींनी आणले जाते. हा समुद्री मार्गही खूप प्राणघातक आहे. ब्रिटनचे केअर स्टार्मर सरकार निर्वासितांना बिली स्टॉकहोम नावाच्या तरंगत्या जहाजावर ठेवण्याची योजना आखत आहे. मागील सुनक सर

# संग्रामपूर तालुक्यात संत्रा केंद्र उभारणीला मंजूरी

**मुंबई, १६ सप्टेंबर (वृत्तसंस्था) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आज (१६ सप्टेंबर) ८ महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यामध्ये राज्यासाठी नवीन ॲनिमेशन आणि गेमिंग धोरण २०२५ मंजूर करण्यात आले असून, मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या भत्त्यात मोठी वाढ करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. शिवाय विद्यार्थीनीसाठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात सुमारे दुपटीने वाढ करण्याचा निर्णयही झाला आहे. या निर्णयाच्या परिणामी राज्यातील हजारो विद्यार्थी-विद्यार्थीनी दिलासा मिळणार आहे. नागपूर, काटोल, कळमेश्वर, (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती ) व संग्रामपूर, (जि.बुलढाणा) येथे आधुनिक संत्रा केंद्र उभारण्यात येत आहेत. मुदतवाढीसह योजनेच्या स्वरुपात अनुषंगिक बदल करण्यास मान्यता सार्वजनिक भंडारा ते गडचिरोली दरम्यान ९४ किलोमीटरचा द्रुतगती महामार्ग. प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार.

# आमना नदीला पूर; शेतकरी हवालदिल



**देऊळगाव राजा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** काल झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे आमना नदीला मोठा पूर आला असून जवळखेड , आसोला , गोंधणखेड ,जळगाव ,पिंपळगाव ,सावंगी टेकाळे या परिसरातील नदीकाठच्या शेजाऱ्यांचे १००% नुकसान झाले असून पिके पाण्याखाली जाऊन खरडून गेली आहेत .त्या मुळे शेतकऱ्याचा तोंडी आलेला घास पुराच्या पाण्याने हिरावून घेतला आहे. १५ सप्टेंबर व १६ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे पिं-पळगाव बुद्रुक येथील आमना नदीला गेल्या दहा वर्षात गेला नाही असा खूप मोठा पूर आल्याने जळगाव पिं-पळगाव येथील नदीवर झालेल्या नवीन पुलावरून सुद्धा पुराचे पाणी गेले असून सदर पुरामुळे पिंपळगाव बुद्रुक शिवारातील नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकातून पूर गेल्याने सोयाबीन, कापूस,कॉटन सीड,मका व इतर पिके यामधून पाणी गेल्यामुळे खरडून जाऊन हजारो हेक्टर पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे पिकांचे अत-ोनात नुकसान झाले असून या अगोदरच भयंकर पाऊस झाल्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर अडचणीत सापडला आहे व पाठोपाठ काल-परवाच्या पाण्यामुळे सुद्धा आमदानी लगतच्या हजारो एक्कर शेतातून पुराचे पाणी गेल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकरी बांधव चिंतेत सापडला आहे.तरी कृषी विभागाने तसेच संबंधित विभागाने तसेच लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालून तात्काळ पिंपळगाव बुद्रुक, सावंगी टेकाळे जळगाव, असोला , जवळखेड,गोंधणखेड जळगाव देऊळगाव राजा तालुक्यातील आमना नदी लगत असलेल्या गाव-ातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी व ओला दुष्काळ घोषित करण्यात यावा अशी मागणी जोर धरत आहे .




गुड इव्हिनिंग City | बातम्या तसेच जाहीरातीसाठी संपर्क | प्रकाशक : रणजीतसिंग राजपूत ९८५०३७७३४४ | संपादक : ॲड. हरीदास उंबरकर ९७६३४६९१८४ // गुड इव्हिनिंग सिटी सोशल मिडीयावर सुद्धा... किंमत १ रू.

# ओबीसी बांधवांनी एकजूट होऊन हक्कासाठी लढणे काळाची गरज

## ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाच्या अधिवेशनात मान्यवरांचा सामायिक सूर





**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन व एक दिवसीय चिंतन शिबीर आज रविवारी, १४ सप्टेंबरला शेगाव येथील हॉटेल विघ्नकर्ता इन मध्ये पार पडले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ओबीसी बांधवांना उपयुक्त मार्गदर्शन केले. ओबीसी बांधवांनी काळाची पाऊले ओळखत ओबीसीचा खरा शत्रू कोण हे ओळखून आपल्या न्याय्य हक्कासाठी एकजुटीने लढा देण्याचे विनम्र आवाहन करतानाच सतर्क राहण्याचे सामूहिक आवाहन केले. यामुळे हे राज्य अधिवेशन राज्यभरातून उपस्थित ओबीसी बांधवांना आणि पदाधिकाऱ्यांना एकाच वेळी चिंतनास भाग पाडणारे तसेच भविष्यातील धोके ओळखून लढा उभारण्यासाठी मार्गदर्शक ठरले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक संजय थुल आणि कमलकांत काळे यांनी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील शेळके यांचे भरभरून कौतुक केले तसेच भविष्यातील चौफेर, व्यापक लढ्यात संघटना निर्णयाक भूमिका पार पाडणार असा विश्वास बोलून दाखविला. आयोजक तथा ओबीसी अधिकारी, कर्मचारी संघांचे संस्थापक अध्यक्ष सुनील शेळके कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख वक्ते म्हणून युनिटी ऑफ मुलनीवासी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष व ओबीसी अभ्यासक कमलाकांत काळे आणि जीएसटी विभागाचे माजी सहायक आयुक्त आणि एससी, एसटी, ओबीसी कर्मचारी वेल्फेअर फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय थुल उपस्थित होते. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष पद संघटनेचे बुलडाणा जिल्हाध्यक्ष किशोर पवार यांनी भूषविले. अधिवेशनाला संघटनेचे राज्य सल्लागार डॉ. शिवशंकर गोरे, महासचिव राम वाडीभष्मे, अधिवेशनाचे जिल्हा सरचिटणीस विठ्ठल पाटेखेडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय ठाकरे,सुनिल धंदर,संतोष सातव, जिल्हा संघटक विकी जगताप, सहसंघटक सुधीर दाते,सहसचिव प्रकाश आढाव, गजानन अहिरे प्रसिद्धी प्रमुख विठ्ठल इंगळे तालुकाध्यक्ष शेगाव प्रमोद इंगळे, खामगाव रमेश जुमळे, नांदुरा रामविजय ढोरे, संग्रामपूर शाम कौलकार,जळगाव जामोद तुषार आसोलकर,मलकापूर संजय उमाळे, मोताळा निळकंठ उचाडे, बुलडाणा गजानन पडोळ, चिखली राजाभाऊ वायाळ, मेहकर गणेश पऱ्हाड, देऊळगाव राजा संदीप शिंदे, सिंदखेडराजा नंदकिशोर खरात संजय खांडवे, गजानन हूडेकर,गजानन राऊत अनिल पवार मुरलीधर टेकाळे,रविंद्र सावळे आदि पदाधिकारी उप- स्थित होते. मंडल आयोग अहवालाची अंमलबजावणीची घोषणा तत्कालीन प्रधानमंत्री व्ही. पी. सिंग यांनी ७ ऑगस्ट १९९० रोजी केली होती. तसेच सत्यशोधक समाजाची स्थापना महात्मा ज्योतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी केली होती. या दोन ऐतिहासिक दिवसांच्या स्मरणार्थ ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाच्यावतीने गतवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा राज्य अधिवेशन व एक दिवशीय चिंतन शिबीराचे आयोजन करण्यात आले. शेगाव येथील विघ्नहर्ता हॉटेल येथे पार पडलेल्या या अधिवेशनात राज्यातील पदाधिकारी, ओबीसी समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

## बहुचर्चित हैदराबाद गॅझेट लागू करू नये : दिलीप मोरे



**खामगाव, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** महाराष्ट्र राज्य वीर एकलव्य आदिवासी अधिकारी कर्मचारी संघटना (म. रा.) व सर्व आदिवासी समाजाच्या वतीने, १५ सप्टेंबर रोजी उपविभागीय महसूल अधिकारी तथा तालुका दंडाधिकारी खामगाव यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबई यांना निवेदन देण्यात आले. महाराष्ट्र राज्यांमध्ये बहुचर्चित व अन्यायकारक हैदराबाद गॅझेट लागू करू नये. काही समूहामध्ये व समाजामध्ये वादंग निर्माण होईल असे कोणतेही गॅझेट लागू करू नये. आपला देश व आपले राज्य संविधानावर चालते व त्याप्रमाणे राज्यांच्या सीमा ठरलेल्या आहेत, राज्यामध्ये विविध जाती तसेच जमाती यांचा उल्लेख स्पष्टपणे संविधानामध्ये असून त्याआधारे जाती व जमाती यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. व त्यांना जात व्यवस्था व संस्कृती, चालीरुढी, परंपरा नुसारच प्रवर्गात बसवलेले आहे. त्यामुळे कोणाचेही आरक्षण काढून कोणत्याही दुसऱ्या जातीला देऊ नये व आदिवासी समाजामध्ये कुठलीही इतर जाती समाविष्ट करू नये अशी विनंती मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना आदिवासी समाजाच्या वतीने करण्यात आली. याप्रसंगी दिलीप मोरे आदिवासी नेते, बुलढाणा व श्री जनार्दन मोरे माजी सरपंच पिंप्री गवळी व बहुसंख्या आदिवासी बांधव उपस्थित होते.

## चार ब्रास रेतीसाठा जप्त

**देऊळगाव राजा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** खडकपूर्णा नदीपात्र व धरण क्षेत्रातून सुरू असलेल्या रेतीच्या अवैध वाहतुकीवर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत चार ब्रास रेतीसह वाहन असा ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई १४ सप्टेंबर रोजी सिनगाव जहांगीर येथे करण्यात आली. एलसीबी पथकाने देऊळगाव राजा-चिखली रोडवरील शिनगाव फाटा येथे सापळा रचून रेतीची अवैध वाहतूक करणारा टिप्पर (एमएच १४ एमएच ८०८८) पकडला. त्यामधील चार ब्रास रेतीसह (किंमत ४० हजार रुपये) टिप्पर पंचासमक्ष जप्त करून देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात जमा करण्यात आला. सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक ओमप्रकाश सावळे यांच्या फिर्यादीवरून दत्तात्रय सारंगधर बोबडे (२८, रा. सिनगाव जहांगीर) याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास हेडकॉन्स्टेबल माधव कुटे करीत आहेत.

## लोणारमध्ये मोदींच्या स्वच्छ भारत मिशन अभियानास काळीमा फासण्याचे काम



**लोणार, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी/भुषण शेटे) :** शहरातील मुख्य रोडवरील बस स्टॅन्ड चौक ते जामा मस्जिद चौक पर्यंत नाली साफ करून मुख्य नालीस जोडणे बाबत नमूद विषयाची तक्रार तसेच सदरील समस्ये संदर्भात कित्येक वर्षापासून वेळोवेळी तोंडी व लेखी तक्रारी देऊन सुद्धा कारवाई होत नसल्याने अखेर मागणी पूर्ण होण्यासाठी दिनांक १७ सप्टेंबर २०२५ पासून मरणांतक बिना पाण्याचे उपोषण लोणार नगर पालिके समोर करणार असल्याबाबत नमूद तक्रार दिनांक १५ सप्टेंबर रोजी लोणार येथील रहिवासी विजय तोष्णीवाल यांनी मुख्याधिकारी नगर परिषद लोणार तथा संबंधित विभागाकडे केली आहे. जागतिक कीर्ती प्राप्त लोणार शहराला पर्यटन स्थळ, वन्यजीव अभयारण्य सह विविध शासन स्तरावर दर्जे प्राप्त असून शहराला धार्मिक, पौराणिक व वैज्ञानिक महत्त्व आहे. पर्यटन नगरी लोणार शहरातील धारातीर्थ, लोणार सरोवर, मोठा मारुती मंदिर, देत्यसूदन मंदिर तथा लोणार येथील सर्व पर्यटन स्थळाकडे तसेच शहरात जाणारा मुख्य रहदारीचा बस स्टँड चौक ते धारातीर्थ रोड असून या रोडच्या दुतर्फा दुकाने असून ही मार्केट लाईन आहे असे असताना या रोडवर बस स्टॅन्ड चौक ते जामा मस्जिद चौक रोडच्या दुतर्फा नाल्या असून सदरील नाल्या कित्येक वर्षापासून साफ होत नसल्याने या मुख्य रोडवरील जाग- ोजागी असलेल्या खड्ड्यांमध्ये पावसाचे दुर्गंधीयुक्त पाणी साचत असल्याने दुचाकी वाहने चालविणे तर सोडा नागरिकांना तसेच येणाऱ्या पर्यटकांना पायदळी चाल- ताना पाण्यातून वाट शोधून चालावे लागत असल्याने छोटे मोठे अपघात घडत असून या पाण्यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन या रस्त्याने रस्त्यावरील साचलेल्या पाण्यातून मार्ग काढत जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. यामुळे नागरिकांचे मानसिक खच्चीकरण होत आहे. पर्यटन नगरीतील या मुख्य रस्त्यासह शहरातील विविध रस्त्यावर सुद्धा अशाच प्रकारे जागोजागी पावसाचे पाणी साचले असल्याने लोणार पर्यटन नगरी संपूर्ण जगात प्रसिद्ध असताना मुख्याधिकारी यांच्या दुर्लक्षित पणामुळे पर्यटन नगरी लोणार सरोवर शहराचे नावलौकिक खराब होत असून या कारणामुळे देश विदेशातून येणारे पर्यटक पर्यटन स्थळे पाहण्यासाठी येत नसल्याचे दिसून येत आहे. हा रोड मुख्य पर्यटन स्थळाकडे जाणारा रस्ता असल्याने या रस्त्याने लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी जाणे येणे करीत असताना सदरील रोडवर साचलेले पाणी त्यांना दिसत असतांना सुद्धा या बाबीकडे लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप तक्रार कर्ते यांनी केला असून तशी चर्चा सुद्धा लोणार शहरात होताना दिसून येत आहे. आता तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही होणार की उपोषणकर्त्यास उपोषण करावे लागणार याकडे पर्यटन वासियांचे लक्ष वेधले आहे..

## बळीराजा



**१) आत्महत्या ह्या नैराशेतून घडतात:-**

खर तर जीवन जगत असतांना प्रत्येक माणसाच्या जीवनात यश-अपशय, जय-पराजय या गोष्टी येतातच. जीवन जगतांना यश-अपयश, जय-पराजय ह्या एकाच नाण्याच्या गोष्टी आहेत. जीवन जगतांना माणसाच्या जीवनात यश आल किंवा एखाद्या कामात विजय मिळाला तर माणूस खुश होतो परंतु जर माणसाच्या जीवनात अपयश आल किंवा एखाद्या कामात पराजयाचा सामना कराव लागला तर त्या माणसाला सहन होत नाही आणि भावनेच्या आहारी जाऊन तो दुःखी होतो. या नैराशेमुळे माणसाला जीवन हे व्यर्थ वाटू लागते अशा परिस्थितीत माणूस अपयश पचवू शकत नाही. या जीवनात आलेल्या नैराशेमुळे माणूस आत्मघात करून आत्महत्या करतो व आपल जीवन संपवतो.

**२)आत्महत्या ह्या रागाच्या भरात घडतात:-**

आत्महत्या करण्याचे मुख्य कारण हे क्रोध म्हणजे राग हे आहे. जीवन जगतांना माणूस रागाच्या भरात आत्महत्या करतात. जीवन जगतांना माणसाला राग येणे स्वाभाविक आहे. माणसाचे जे सहा शत्रू आहेत त्यात रागाचा क्रमांक वरचा आहे तसेच आत्महत्या करण्याच्या घटणा ह्या रागाच्या भरात जास्त प्रमाणात आहेत. राग म्हणजे आपल्याला न आवडणारे तसेच मनाच्या विरोधात घटत असलेल्या घटनामुळे मन संतप्त होऊन जाणे म्हणजे राग येणे. रागाच्या भरात माणूस आत्महत्या करतो. माणसाला रागाच्या भरात आपण काय करतो याचे भान राहत नाही. जीवन जगतांना काही गोष्टी जीवनात अशा घडतात कि राग न येत असलेल्या माणसालाही तो येतो मग त्या माणसाकडून आत्महत्ये सारखे प्रकार घडतात. रागात माणूस स्वतःलाही संपवण्यास मागे-पुढे पाहत नाही. रागाच्या भरात आत्महत्या घडतात हि जीवनाची खरी वास्तविकता आहे. ज्या प्रमाणे रागात आत्महत्या घडतात त्याच प्रमाणे हट्टामुळेही आत्महत्या घडतात.

**३) आत्महत्या ह्या तणावातून घडतात:-**

जीवन जगत असलेल्या प्रत्येक माणसावर ताण असतोच. काहींना ताण जाणवतो व काहींना ताण जाणवत नाही. ताण जाणवला नाही तरीही त्याने शरीरावर परिणाम होत असतात. ताण हा खर तर वीणेच्या तारेसारखा आहे. जीवन जगतांना माणसाच्या जीवनात ताण हा योग्य प्रमाणात असला, तर जीवन समृद्ध होते. पण ताण वाढला, तर तुटते अगदी वीणेच्या तारेप्रमाणे. प्रिय व्यक्तीचा मृत्यू, प्रेमभंग, घटस्पोट, गंभीर आघात वगैरे आघातजन्य प्रसंग, लैंगिक शोषण अथवा शारीरिक शोषण वगैरे बाल्यकालीन कटू अनुभव, गंभीर आर्थिक विवंचन, कौटुंबिक, व्यावसायीक, अंतर्व्याक्तिक समस्या, सामाजिक समस्या इत्यादी परिस्थितीजन्य घटक व्यक्तीत तीव्र ताण निर्माण करतात. ट्रौम कॉक्सच्या मते, व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक स्वास्थाला असणारा धोका म्हणजे ताण. जीवन जगतांना माणूस या तणावावर उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो. उत्तर शोधतांना त्याचा सामना व्यसनाशी होतो. ताणावात व्यसनाच्या आहारी जाऊन शेवटी माणूस आत्मघात करून आत्महत्या करतो.

**४) आत्महत्या ह्या वेदना आणि अतितीव्र आजारात घडतात:-**

काही आत्महत्या ह्या आजाराच्या वेदनांना कंटाळून तसेच वेदना सहन न झाल्यामुळे घडतात.

५) आत्महत्या ह्या कौटुंबिक कलह मधून घडतात:-

जीवन जगतांना संसारात भांड्याला भांड लागणारच यातूनच कौटुंबिक कलह निर्माण होतात. अनेक आत्महत्या ह्या कौटुंबिक कलहाच्या माध्यमातून देखील होतात.

**आत्महत्या टाळण्यासाठी काय करावे?**

१) आत्महत्या टाळण्यासाठी माणसाने सर्वप्रथम आपल्यावर असलेला तणाव कमी करावा. यासाठी माणसाने मन एकाग्र करण्यासाठी ध्यानाचा मार्ग अवलंबवाव तसेच मन प्रसन्न ठेवण्यासाठी मनाचे पवित्र जपावे. इसप यांच्या म्हणण्यानुसार, शेताप्रमाणेच मनाचीही मशागत माणसाने केली पाहिजे कारण मनाची शुद्धता जसजशी वाढत जाते, तसतसे माणसाचे महत्व जागृत होते आणि ती जसजशी कमी होते, तसतसे त्याच्या अंगी पशुत्व वाढत जाते. खर तर जीवन जगतांना मनाची मशागत माणसाने करणे गरजेचे आहे.

२) बहुतांशी आत्महत्येचे कृत्य अचानक एका दिवसात घडून येत नाही तर प्रत्यक्ष आत्म्हत्येपुर्वी अनेक दिवस व्यक्तींच्या मनात आत्महत्येचे विचार घोळत असतात. जवळ-जवळ ८० प्रतिशत आत्महत्या करणारी व्यक्ती शाब्दीक व इतर कृतीतून आत्महत्येचे संकेत व्यक्त करत असतात. आत्महत्या करणार व्यक्ती 'मरावे किंवा मरू नये' या दुविधा मनस्थितीत असतात. वेळेच दखल घेवून अश्या व्यक्तीकडे लक्ष देणे नैराश्य अथवा इतर मनोविकार असणार व्यक्तींना विद्युत कंप चिकित्सा व औषधोपचाराचा अवलंब करणे उपयुक्त ठरते.

३) आत्महत्या टाळण्यासाठी रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. ज्या माणसाने जीवन जगतांना रागावर नियंत्रण ठेवले त्याच्या सोबत अनर्थ बहुदा टळू शकते.

४) आत्महत्या टाळण्यासाठी अपयश पचवणे माणसाने शिकावे.

५) आत्महत्या टाळण्यासाठी जीवनाचे महत्व माणसाने समजून घेणे गरजेचे आहे.खर तर जीवनाचे मोल माणसाने जाने गरजेचे आहे.

६) आत्महत्या टाळण्यासाठी मनाची शुद्धता जपणे गरजेचे आहे.माणूस हा विच- ारशील प्राणी आहे अशी माणसाची व्याख्या केली जाते.माणसाचे मन हे चंचल आहे त्यावर कोणाचेही बंधन नसते. चंचल मनाला नियंत्रणात ठेवणे हे आवश्यक आहे.

२०१२ मध्ये देशभरात १ लाख ३५ हजार ४४५ व्यक्तींनी आत्महत्या केल्या.१६,११२ आत्महत्या झालेला महाराष्ट्र देशात दोन नंबरवर आहे. देशातील एकूण आत्म्हत्यांपैकी ११,४३८ आत्महत्या स्वतःला जाळून घेवून केल्या गेल्या असून यातही तामिलनाडूच्या पाठोपाठ महाराष्ट्राचा क्रमांक दुसरा आहे. महाराष्ट्रात गेल्या वर्षी १,६४७ व्यक्तींनी जाळून घेवून जीवन संपविले. 'नेशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो' ने (एनसीआरबी) जरी केलेल्या आकडेवारीनुसार देशात गेल्या वर्षी आत्महत्या केल्यांमध्ये पुरुषांची संख्या महिलांच्या तुलनेत जवळपास दुप्पट होती. ७९,७७३ पुरुषांनी तर ४०,७१५ महिलांनी आत्महत्या केल्या. ब्युराच्या आकडेवारीचे विश्लेषण केले असता असे दिसते कि, गेल्या वर्षी देशात आत्महत्येचे प्रमाण दर एक लाख लोकसंख्येमागे ११.२ एवढे होते.सरासरी दर तासाला १५ किंवा दररोज देशात सरा- सरी ३७१ आत्महत्या घडल्या व गेल्या वर्षी देशभरात २४२ पुरुषांनी व १२९ महिलांनी दररोज स्वतःचे जीवन संपविण्याचे टोकाचे पाऊल उचलले, असे ही आकडेवारी सांगते. गेल्या वर्षी एकूण ५०,०६२ जणांनी गळफास लावून तर १९,४४५ व्यक्तींनी विषप्राशन करून आत्महत्या केल्या. याखेरीज ४,२५९ व्यक्तींनी भरधाव वाहनापुढे व विशेषतः रेल्वेगाडीपुढे उडी मारून आत्महत्या केल्या. २०१३ मध्ये महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्यांची नोंद झाली. 'नेशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो' ने (एनसीआरबी) जारी केलेल्या अहवालात ही आकडेवारी समोर आली आहे. २०१३ मध्ये आत्महत्येच्या घटनांची संख्या १,३४,७९९ नोंदण्यात आली असून, दशकापूर्वी २००३ मध्ये ही संख्या १,१०,८५१ एवढी होती. मधल्या काळाच्या तुलनेत २०११ नंतर आत्महत्यांचा दर कमी झाल्याचा दावाही या अहवालात करण्यात आला. त्याचे कारण या दशकाच्या काळात लोकसंख्येत १५ टक्के वाढ झाली असतांना आत्महत्यांचा दर ५.७ टक्क्यांनी वाढला आहे. आत्महत्येचा दर २००३ मध्ये १०.४ टक्के होता तो २०१३ मध्ये ११ टक्क्यांपर्यंत वाढला. गेल्या दशकात आत्महत्येच्या दारात घट आणि वाढ अशी संमिश्र नोंद झाली. २०१३ मध्ये १६,६२२ आत्महत्यांची नोंद झालेले महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. त्यापाठोपाठ तामिळनाडूचा दुसरा क्रमांक लागतो. या दोन राज्यांमधील आत्महत्यांचे प्रमाण १२.३ टक्के आहे. महाराष्ट्र १६,६२२ आत्महत्या, तामिळनाडू १६,६२२, आंध्रप्रदेश १४,६०७, प.बंगाल १३,०५५, कर्नाटक ११,२६६ आत्महत्या झाल्या. या पहिल्या पाच क्रमांकाच्या राज्यामधील आत्महत्यांचे प्रमाण ५३.५ टक्के आहे. अन्य ४६.५ टक्के आत्महत्या उर्वरित २३ राज्ये आणि सात केंद्रशासित प्रदेशांमधील आहेत. गेल्यावर्षी चेन्नईट सर्वाधिक २४५० आत्महत्या झाल्या असून बंगळुर मध्ये २०३३, दिल्ली १७५३, आणि मुंबई १३२२ आत्महत्या झाल्या. देशातील प्रमुख ५३ शहरांच्या तुलनेत चार महानगरांतील आत्महत्यांचे प्रमाण ३५ टक्के आहे. शेवटी एव्हडेच सांगाव वाटते कि, कोशिश करनेवालोकी कभी हार नाही होती, और हार माननेवालोकी कभी जीत नही होती. देशात होत असलेल्या शेतकरी आत्महत्या थांबावं आणि शेतकऱ्यांना सुगीचे दिवस याव एवढीच अपेक्षा!

गुड इव्हिनिंग City

गुड इव्हिनिंग City

# प्रगतीमंत्र

# आयआयएमकडून एमबीएसाठी नवीन प्रवेश प्रक्रिया सुरू

**जर तुम्हाला आयआयएममधून व्यवस्थापनाचा अभ्यास करायचा असेल तर तुमच्यासाठी खूप महत्वाची बातमी आली आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) ने एक नवीन प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. ही नवीन प्रक्रिया एमबीए प्रवेश २०२६ पासून सुरू होईल. त्याचे नाव आहे- संयुक्त प्रवेश प्रक्रिया (Joint Admission Process). देशातील चार वेगवेगळ्या आयआयएमने एकत्रितपणे ती सुरू केली आहे. JAP सुरू करणाऱ्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटची नावे IIM काशीपूर, IIM रायपूर, IIM रांची आणि IIM तिरुचिरापल्ली अशी आहेत. IIM रायपूर हे त्याचे समन्वयक असेल, जे सर्व 4 IIM मध्ये MBA प्रवेशांवर देखरेख करेल.**



## IIM मध्ये JAP म्हणजे काय?

कॉमन ॲडमिशन प्लेटफॉर्मसारखे याला समजा. पुढच्या वर्षी एमबीए प्रवेशासाठी जेएपी २०२६ असेल. जर तुम्हाला या चारही आयआयएममध्ये प्रवेश घ्यायचा असेल तर तुम्हाला जेएपीचे पालन करावे लागेल. तुम्हाला याद्वारे अर्ज करावा लागेल. तुम्ही या एकाच प्लॅटफॉर्मवरून चारही संस्थांमध्ये अर्ज करू शकता. आयआयएम रायपूरचे प्रभारी संचालक प्रोफेसर संजीव प्राशर म्हणाले की, ज्वाइंट ॲडमिशन प्रोसेस २०२६ मुळे याच्याशी संबंधित मॅनेजमेंट इंस्टिट्यूट्समध्ये परस्पर सहकार्य वाढेल. संसाधनांचा योग्य वापर केला जाईल. तसेच, आयआयएममधील प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विद्यार्थी-केंद्रित होईल. आयआयएम ब्रँड म्हणून मजबूत होईल.

## कॅटची आवश्यकता असेल की नाही?

तुम्ही कदाचित विचार करत असाल की या नवीन प्रक्रियेमुळे कदाचित कॅट परीक्षेचा त्रास संपेल. पण तसे नाही. आयआयएमसाठी कॅट परीक्षा देणे अजूनही बंधनकारक असेल. कॅट स्कोअरच्या आधारे, तुम्ही या ४ आयआयएममध्ये जेएपीद्वारे अर्ज करू शकाल. इतर सर्व आयआयएमसाठी प्रवेश प्रक्रिया पूर्वीसारखीच असेल.

# मूळ पगार १.०५ लाख पर्यंत

## इंडियन ओव्हरसीज बँकेत व्यवस्थापक, वरिष्ठ व्यवस्थापक पदांची भरती, आताच करा अर्ज

**सरकारी बँकेत नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांसाठी इंडियन ओव्हरसीज बँकेत नवीन भरती आली आहे. बँकेने स्पेशलिस्ट ऑफिसर रिक्रूटमेंट अंतर्गत विविध पदांसाठी मॅनेजर, सीनियर मॅनेजरच्या रिक्त जागांवर भरती जाहीर केली आहे. यासाठी ऑनलाइन अर्ज १२ सप्टेंबरपासून सुरू झाले असून, अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३ ऑक्टोबर निश्चित करण्यात आली आहे. तुम्ही बँकेच्या अधिकृत वेबसाइट www.iob.in वर अर्ज करू शकता. इंडियन ओव्हरसीज बँक भारत सरकारच्या अंतर्गत काम करते. अशा परिस्थितीत जर तुम्ही बँकिंग सरकारी नोकरीची तयारी करत असाल, तर तुम्ही या भरतीमध्ये अर्ज करू शकता. सरकारी नोकरी मिळविण्यासाठी ही एक उत्तम संधी असू शकते.**




- एससी/एसटी/पीडब्ल्यूडी उमेदवारांना अर्जासाठी १७५ रुपये अर्ज शुल्क भरावे लागेल. ओबीसी/ईडब्ल्यूएस उमेदवारांना १००० रुपये शुल्क भरावे लागेल. या भरतीच्या लेखी परीक्षेत इंग्रजी भाषा, सामान्य ज्ञान विशेष बँकिंग उद्योग, व्यावसायिक ज्ञान या विषयांवर एकूण १०० प्रश्न विचारले जातील. परीक्षेत १/४ निगेटिव्ह मार्किंग देखील असेल.

- बँक : इंडियन ओव्हरसीज बँक (IOB)
- पदाचे नाव : स्पेशलिस्ट ऑफीसर
- ग्रेड : MMGS II, MMGS III
- अर्ज सुरू होण्याची तारीख : १२ सप्टेंबर २०२५
- अर्ज करण्याची शेवटची तारीख : ३ ऑक्टोबर २०२५
- अधिकृत वेबसाइट www.iob.in
- रिक्त जागा १२७
- पगार : MMGS II- ६४८२० ते ९३९६० रुपये
- MMGS III ८५९२०-१०५८० रुपये
- (हा मूळ पगार असेल. याशिवाय, इतर भत्ते देखील पगारात जोडले जातील)
- वयोमर्यादा : किमान २५ ते ४० वर्षे
- निवड प्रक्रिया : परीक्षा आणि मुलाखत
- प्रोबेशन कालावधी : २ वर्षे




## पात्रता काय आवश्यक?

भरतीद्वारे व्यवस्थापक सिव्हिल, आर्किटेक्ट, इलेक्ट्रिकल, ऑटोमोबाइल, कॉर्पोरेट क्रेडिट, आयटीसारखी पदे भरली जातील. सर्वांसाठी पात्रतादेखील वेगवेगळी आहे. उदाहरणार्थ, मॅनेजर (आयएस ऑडिट) साठी उमेदवारांकडे एमसीए/एमएससी कॉम्प्युटर सायन्स/बीई/बीटेक असणे आवश्यक आहे आणि २-३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. मॅनेजर सिव्हिलकडे बीई/बीटेक पदवी असणे आवश्यक आहे आणि सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. मॅनेजर (ट्रेझरी) कडे मॅनेजमेंट/फायनान्स/इंटरनॅशनल बिझनेस/ट्रेड फायनान्समध्ये एमबीए/पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, इतर पदांसाठी पदव्या मागवण्यात आल्या आहेत. तुम्ही भरती अधिसूचनेतून हे तपशील तपासू शकता.

## अर्ज कसा करायचा?

- सर्वप्रथम इंडियन ओव्हरसीज बँकेच्या www.iob.in अधिकृत वेबसाइटवर जा.
- येथे करिअर किंवा भरती विभागावर क्लिक करा.
- तेथे स्पेशलिस्ट ऑफिसर रिक्रूटमेंटशी संबंधित सूचना पहा.
- ते काळजीपूर्वक वाचा आणि पात्रतेशी संबंधित माहिती पहा.
- आता ऑनलाइन अर्ज करा या लिंकवर क्लिक करा.
- ऑनलाइन नोंदणीसाठी तुमची मूलभूत माहिती भरा.
- लॉगिन करा आणि इतर आवश्यक तपशील भरा.
- छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि हस्तलिखित घोषणा ऑनलाइन अपलोड करा.
- तुमच्या श्रेणीनुसार अर्ज शुल्क भरा.
- फॉर्मची अंतिम प्रिंट काढा.

# IB ACIO परीक्षेचे प्रवेशपत्र जारी!

**इंटेलिजेंस ब्युरो ACIO परीक्षेला बसणारे सर्व उमेदवार त्यांचे प्रवेशपत्र ऑनलाइन डाउनलोड करू शकतात. ही परीक्षा १६ ते १८ सप्टेंबर दरम्यान होणार आहे. उमेदवार गृह मंत्रालयाच्या अधिकृत वेबसाइट www.mha.gov.in वरून IB ACIO प्रवेशपत्र ऑनलाइन तपासू शकतात. यासाठी तुम्हाला लॉगिन तपशील योग्यरित्या भरावे लागतील. आयबी एसीआयओ ॲडमिट कार्ड डाउनलोड डायरेक्ट लिंक देखील बातमीत दिली आहे.**

इंटेलिजन्स ब्युरोने जारी केलेल्या ३७१७ पदांसाठी असिस्टंट सेंट्रल इंटेलिजन्स ऑफिसर ग्रेड २ (एसीआयओ) साठीची ही परीक्षा १६, १७ आणि १८ सप्टेंबर रोजी होणार आहे. ही टियर १ परीक्षा आहे. परीक्षेच्या तीन दिवसांपैकी तुमची परीक्षा कधी आहे? परीक्षा केंद्र कुठे आहे? केंद्राचा पत्ता काय आहे? तुम्हाला किती वाजता केंद्रावर पोहोचावे लागेल? तुम्हाला ही सर्व माहिती प्रवेशपत्रावरच मिळेल. तुम्ही ते मोबाईल, लॅपटॉप इत्यादींवरून स्वतः ऑनलाइन डाउनलोड करू शकता.



### आयबी ॲडमिट कार्ड कसे डाउनलोड करायचे?

- सर्वप्रथम अधिकृत वेबसाइट mha.gov.in वर जा.
- येथे Recruitment विभागात आयबी एसीआयओ ॲडमिट कार्ड २०२५ डाउनलोड लिंकवर क्लिक करा.
- तुमचा ॲडमिट कार्ड डाउनलोड डॅशबोर्ड तुमच्यासमोर उघडेल.
- तुमचा अर्ज क्रमांक आणि जन्मतारीख/पासवर्ड इत्यादी तपशील भरा.
- तुम्ही सबमिट करताच, ॲडमिट कार्ड तुमच्या स्क्रीनवर दिसेल.
- परीक्षेसाठी त्याची पीडीएफ काढा.

- आयबी ACIO भरतीसाठी १९ जुलै ते १० ऑगस्ट दरम्यान अर्ज प्राप्त झाले होते. या पदासाठी निवड लेखी परीक्षा आणि मुलाखतीद्वारे केली जाईल. गुप्तचर विभागात अधिकारी स्तरावर पोस्टिंग मिळाल्यानंतर, उमेदवारांना लेव्हल-०७ नुसार दरमहा ४४,९०० ते १,४२,४०० रुपये मूळ वेतन दिले जाईल. याशिवाय, पगारात इतर भत्ते देखील जोडले जातील. ज्यामुळे दरमहा पगार आणखी वाढेल. परीक्षेशी संबंधित इतर कोणतीही माहिती मिळविण्यासाठी, उमेदवारांना गृह मंत्रालयाच्या अधिकृत वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

# प्रगतीमंत्र

**दहावी, बारावी, इंजिनीअरिंग यासारख्या काही परीक्षा विद्यार्थ्यांसाठी खूप महत्त्वपूर्ण असतात. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी-पालक यांच्यात ताण तणाव वाढत असतो. विद्यार्थ्यांना अभ्यासाचं, परीक्षेचं, अपेक्षित गुणांचं टेन्शन तर पालकांना पाल्यांच्या करिअरचं टेन्शन असतं. परीक्षा म्हणजे तणाव हा विचार बाजूला ठेवून परीक्षा म्हणजे संधी हा विचार केला तर यासंबंधीच्या अनेक समस्या सुटू शकतील...**

## बदला विचारांची दिशा...



पालकांच्या तक्रारी असतात, मुलं नीट अभ्यासच करत नाहीत, सारखा टाईमपास चालतो, संगत बिघडलीये, शाळा-कॉलेजला दांड्या मारतात, उलट उत्तरं देतात, कोडगी झालीत किंवा एकलकोंडी झालीत, चिडचिड करतात, पटकन रडू येतं, नकारात्मक बोलतात, खोटं बोलतात, दिलेल्या सुविधांचा गैरवापर करतात. तक्रारींची यादी मोठी असते. विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यास हा तणावासोबत जोडला गेलाय. त्यामुळे त्या तणावाच्या परिस्थितीतून पळ काढण्यासाठी मन ज्या ठिकाणी सुख, आनंद, शांती वाटेल तिकडे धाव घेत राहतं. यामुळे वेळ जातो, अभ्यास राहून जातो, ताण तणावांची पातळी अजूनच वाढते. मग मन या वाढलेल्या ताणतणावापासून मुक्त होण्याचे त्याच्या समजेनुसार मार्ग शोधत राहते. जे दुर्दैवाने नुकसानकारकच असतात. यावरचा सर्वात ठोस उपाय म्हणजे आपल्या मनाच्या नैसर्गिक गुणधर्मांचा योग्य वापर करून घेणे. आपल्या मनाला अभ्यास, परीक्षा याबद्दलचे वैचारिक, भावनिक, काल्पनिक संदर्भ आनंद, सुखासोबत जोडणे. खरंतर यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यशाचं गुपित हेच आहे. वास्तविक स्वयंविकासाचा पाया असलेलं शैक्षणिक जीवन आपल्यातील अनेक महत्त्वपूर्ण आणि जीवनोपयोगी क्षमतांचा विकास करतं. या सुवर्णकाळाचा खूप नीट वापर केला पाहिजे, भरपूर फायदा करून घेतला पाहिजे.

### अभ्यास स्वतः निर्णय घेऊन करायची गोष्ट...

अभ्यास ही टेन्शन घेवून करण्याची नाही तर स्वतः निर्णय घेऊन करण्याची गोष्ट आहे. मग लगेचच हा निर्णय घ्या की, मला स्वतःला स्वतःसाठी अभ्यास करायचा आहे. हा निर्णय बळकट करण्यासाठी या अभ्यासातून तुम्हाला होणाऱ्या फायद्यांची स्वतःची यादी बनवा. स्वतःला ती अनेकदा आणि नियमितपणे सांगत राहा. अभ्यासाचं स्वतःच वेळापत्रक बनवून ते कसोशीने पाळा. या ठिकाणी एक आश्चर्यकारक गोष्ट सांगतो. जेव्हा अभ्यास करण्याचा निर्णय सर्वार्थाने तुमचा स्वतःचा असतो तेव्हा मन अगदी झटकन सहज एकाग्र होते. खूप चांगला अभ्यास व्हायला लागतो. मला परीक्षेत आठवेल की नाही, वेळ पुरेल की नाही, मी नापास झालो तर? यासारख्या तणाव वाढविणाऱ्या विचारांची उजळणी आपण घरीदारी स्वतःही करत असतो आणि इतरांकडूनही (पालक, शिक्षक, मित्र) स्वीकारत असतो. परीक्षेसंबंधीचे हे विचार बदलणे अत्यंत आवश्यक आहे.

### सर्वोत्तम संधीचं सोनं...

स्वतःला सांगा आणि मान्यही करा की, 'परीक्षा ही मी केलेला अभ्यास व्यक्त करण्याची सर्वोत्तम संधी आहे.' त्यानंतर या सर्वोत्तम संधीचं सोनं करण्याचा निर्धार करा. अगदी तुम्ही कुठल्या विषयात किती मार्क्स मिळविणार हे स्वतःशी ठरवा. तुम्हाला आश्चर्य वाटेल की तुमचा अभ्यासाचा दर्जा विलक्षण सुधारलाय. आपण असामंजस्यापोटी अभ्यास आणि परीक्षेच्या बाबतीत नकारात्मक कल्पना करत असतो. खरंतर अपेक्षा यशस्वी होण्याची आणि विचार कल्पना नापास, अयशस्वी होण्याच्या असतात. त्याऐवजी ही सुधारीत कल्पना मनाला द्या. रोज रात्री झोपताना आणि सकाळी जागे होता क्षणी तसेच दिवसभरात जेव्हा वेळ मिळेल तेव्हा पुढील कल्पनांची दोनतीन वेळा मनोमन उजळणी करा.

- अभ्याससाठी : मी दररोज आनंदाने, प्रसन्नतेने, नियमितपणे अभ्यासाला बसतो आहे. माझं मन अगदी सहजपणे एकाग्र होतंय. प्रत्येक बैठकीत मी ठरवलेला अभ्यास पूर्ण करतोय. तो अभ्यास मला सहजपणे समजतोय, दीर्घकाळ लक्षात राहतोय. मी केलेला अभ्यास मला हवा तेव्हा दिलेल्या वेळेत, सर्व मुद्द्यांसहीत सहजपणे आठवतोय. तोंडी, लेखी स्वरूपात व्यक्त करता येतोय. माझा अभ्यासातील आत्मविश्वास, उत्साह आणि आनंद दररोज वाढतंच राहतोय. याच पद्धतीने मी प्रत्येक विषयाचा अभ्यास करतोय.
- परीक्षेसाठी : अतिशय सहजपणे आणि आत्मविश्वासाने मी परीक्षा हॉलमध्ये जातोय. मन अगदी प्रसन्न, स्थिर आणि शांत आहे. शांतपणे मी उत्तरपत्रिकेवर आवश्यक तो तपशील (तुमचा परीक्षा क्रमांक, विषय आदी) अचूक भरतोय. प्रश्नपत्रिका वाचतोय. प्रश्नांची निवड करून क्रम ठरवतोय. स्थिर मनाने, आत्मविश्वासाने, निर्भयपणे प्रश्नांची उत्तरं लिहितोय. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं मला दिलेल्या वेळेत, सर्व मुद्द्यांसहीत आठवताहेत. मी ही उत्तरे भरभर सुवाच्य हस्ताक्षरात लिहितोय. अगदी वेळेत संपूर्ण पेपर सोडवून झालाय. पेपर तपासतो आहे. पूर्ण पेपर तपासून परत परततोय. परीक्षा हॉलमधून पूर्ण समाधानाने, आत्मविश्वासाने बाहेर पडतोय. याच पद्धतीने मी प्रत्येक विषयाचा पेपर सोडवतो आहे. आपल्या मेंदूसाठी 'थिंकींग इज डूईंग' असं असतं. कल्पनांचा सराव तुमच्यातील सहज अभ्यास करण्याची आणि आत्मविश्वासाने परिक्षा देण्याची सवय वृद्धिंगत करणारा आहे. विचार, भावना, कल्पना आणि कृती एकाच दिशेने जाणाऱ्या असतील तरच आपण आपला सर्वोत्तम परफॉर्मन्स देऊ शकतो.



# कार्यालयीन विरसता का?

**आखून दिलेले काम संपले की आपला आणि कार्यालयाचा संबंध संपला, असा अनेकांचा दृष्टिकोन असतो. पण कार्यालयीन कामापलीकडे आखलेले कार्यक्रम कर्मचाऱ्याला स्वतःचीच नव्याने ओळख देतात. ज्याचा परिणाम अंतिमतः कामासंदर्भातील उत्पादकता वाढवण्यासाठी होतो.**

रोज सकाळी कार्यालयात पोहोचण्यासाठी करावी लागणारी प्रवासाची दगदग, मग दिवसभराचे दमवून टाकणारे काम, साहेबांची टीकाटिप्पणी, सहकाऱ्यांची दडपणे, मासिक, त्रमासिक, वार्षिक लक्ष्य गाठायची धडपड, ग्राहकांशी संवाद, विसंवाद, रात्रपाळी असेल तर दिवसा येणारी झापड आणि इतर अनेक गोष्टी या कार्यालयीन आयुष्य चाकोरीबद्ध करून टाकतात. दिवसांमागून दिवस जातात आणि एक कंटाळा भरून राहतो. आयुष्य निरस होते, कार्यक्षमतेवर परिणाम होतो. असे दमलेले, भागलेले कर्मचारी असलेले कार्यालय लगेच ओळखू येते. खरं म्हणजे आपलं व्यक्तिमत्त्व, आपली ओळख ही काही कामापुरती मर्यादित नसते.

- कामापलीकडच्या कार्यक्रमांमुळे... : कर्मचाऱ्यांचे व्यक्तिमत्त्व उजळते व एक नवीन ओळख निर्माण होते. कर्मचाऱ्यांची सर्जनशीलता वाढते. एकत्र सांघिक कार्य करणे अधिक सुलभ होते. सामुदायिक जबाबदारीची भावना दृढ होते. काही जणांना स्वतःच्याच आतापर्यंत न समजलेल्या गुणांची, मर्यादांची व क्षमतेची नव्याने जाणीव होते. सामाजिक संवेदनशीलता विकसित होते. कर्मचाऱ्यांचे नेतृत्वगुण दृग्गोचर होतात व त्याचा कंपनीला फायदाच होतो.
- कर्मचाऱ्यांनी काय करावे... : जे गुण, कला तुम्हाला अवगत आहेत, त्यासंबंधीच्या कार्यक्रमात पुढाकार घ्या. ज्या सहकाऱ्यांनी विविध कलागुणांत याआधी प्रावीण्य दाखविलेले आहे त्यांच्याशी परिचय करून घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करा. तुम्हाला येणाऱ्या कलागुणांसंबंधी अहंकाराचे प्रदर्शन टाळा. इतरांच्या कलागुणांच्या गुणवत्तेविषयी टीकाटिप्पणी कटाक्षाने टाळा. एखाद्या कार्यक्रमाच्या आयोजन समितीमध्ये स्वयंप्रेरणेने काम करावयाची तयारी दाखवा. दिलेले कुठलेही काम अतिशय प्रामाणिकपणे, नम्रतेने, हुशारीने व निःपक्षपातीपणे करा. बहुतांश वेळेला हे सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम अनौपचारिक वातावरणात साजरे होतात. तरीसुद्धा त्यात सहभागी होणाऱ्या सहकाऱ्यांचे व तुमचे वय आणि हुद्दा अजिबात विसरू नका. काहीवेळा या कार्यक्रमांमध्ये सहकाऱ्यांच्या कुटुंबीयांनासुद्धा आमंत्रण असते. अशा वेळी त्यांची ओळख करून घ्यायचा प्रसंग आला तर त्यांना यथायोग्य आदर द्या. अतिशय नम्रपणे अल्पशब्दात स्वपरिचय करून द्या.
- शिष्टाचार पाळा... : भोजन, नाश्ता, प्रवास व स्नेहसंमेलने अशा काही प्रसंगांत सहकाऱ्यांच्या बरोबर असताना काही विशिष्ट ठिकाणी नेमके शिष्टाचार पाळणे आवश्यक असते. त्याची माहिती करून घ्या व त्याप्रमाणे वागा, म्हणजे तुम्हाला व इतरांना अवघडलेपण वाटणार नाही. काही नाठाळ सहकाऱ्यांच्या नादी लागून कुठलेही गैरप्रकार करायचे टाळा. ज्यामुळे, तुमचे स्वतःचे, तुमच्या गटाचे व कंपनीचे नाव खराब होईल. अशा अनौपचारिक सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांत कुणाल्या तरी अतिउत्साहाने किंवा नाठाळपणाने संकटात, अपघातात सापडल्याची उदाहरणे आपण नेहमी वाचत असतोच. अशा वेळी तुम्ही स्वतः कायम सतर्क राहा व इतरांना सुरक्षित राहण्यासाठी मदत करा.

# 'मेडिकल'चे मार्ग



- हेल्थकेअर आणि हॉस्पिटल मॅनेजमेंट : हेल्थकेअर आणि हॉस्पिटल मॅनेजमेंटमध्ये MBA करण्याचा पर्याय ICRI विद्यार्थ्यांना देते असून, यामध्ये जागतिक स्तरावरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळते. भारतातील आघाडीच्या रुग्णालयांबरोबर ICRI संलग्न असून, विद्यार्थ्यांना नोकरीसाठी उपयुक्त असलेल्या हेल्थकेअर अभ्यासक्रमांचे प्रत्यक्ष शिक्षण, प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाते. या अभ्यासक्रमाला विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता आहे. या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना हेल्थकेअर क्षेत्रात करिअरच्या सुवर्ण संधी उपलब्ध होतील. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी केवळ तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित होत नाही, तर व्यवस्थापनामधील टीम हँडलिंग, ग्राहक सेवा आणि विपणन अशा विविध अंगाचे उपयुक्त ज्ञान त्याला प्राप्त होऊ शकते.
- क्लिनिकल कार्ये समजण्यासाठी : क्लिनिकल क्षेत्रात माहिती, थेरपी आणि सर्जरी विभागांमध्ये काम करणाऱ्यांसाठी अनेक सुविधा यामुळे उपलब्ध होऊ शकतात. हेल्थकेअर प्रशासन सामान्यतः प्रवेश, वित्त आणि कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे मोठ्या प्रमाणावर निराकरण करतात. एखाद्याला क्लिनिकल रिसर्चची माहिती आणि हेल्थकेअर मॅनेजमेंटची पदवी असेल, तर दुहेरी फायदा त्याला मिळू शकतो.

सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City
१६ सप्टेंबर २०२५, मंगळवार

## राष्ट्रवादीच्या महिला शहर अध्यक्ष पदी छाया पाटील तर कार्याध्यक्ष पदी सोनाली शिंदे



**खामगाव, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलडाणा जिल्ह्यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार यांच्या गटात मोठ्या प्रमाणात इन कमिंग सुरू असून राष्ट्रवादी पक्ष मोठ्या प्रमाणात बळकट होत आहे पुरुषांसह आता महिला वर्ग ही राष्ट्रवादी मध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश करीत आहेत राष्ट्रवादी मध्ये प्रवेश केलेल्या सौ छाया पाटील यांना खामगाव शहर महिला आघाडीच्या अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली असून सोनाली शिंदे यांची शहर महिला आघाडी च्या कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रोहिणीताई खडसे यांच्या कडून नियुक्ती पत्र देऊन त्याची नियुक्ती करण्यात आली आहे त्यावेळी खडसे यांनी महिला आघाडी चे स्वागत करत शिव शाहू फुले आंबेडकर यांच्या विचार सरणीवर चालणाऱ्या राष्ट्रवादी पक्षात महिलांना समान न्याय देण्यात येईल अशी ग्वाही दिली आहे राष्ट्रवादी मध्ये मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या इंनकमिंग मुळे आगामी निवडणुकीत त्याचा पक्षाला मोठा फायदा होणार असल्याच बोलल्या जात आहे.

# बुलढाण्यात भूषण यंदे यांच्या घरावर कोसळली वीज; आजूबाजूच्या घरांनाही क्षती

**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** आज सकाळपासून ढगांच्या गडगडाटासह सुरू झालेला पाऊस विजांचा कडकडाट सुद्धा घेऊन आला. क्रीडा संकुल मार्गावरील सालासार मार्बल परिसरातील भूषण यंदे यांच्या घरावर सकाळी ९:३० वाजेदरम्यान वीज कोसळली. भला मोठ्ठा जाळ झाला... ज्या टॉवरवर विजेचा पहिला आघात झाला, त्याची भिंत ब्लास्ट व्हावा तशी फुटली... विटांचे तुकडे शंभर फुटांपर्यंत फेकले गेले... अग्निशलाका आणि कानठळ्या बसवणारा आवाज परिसरातील असंख्य घरांना धडकी भरविणारा होता... काहीतरी अघटित घडले, याची अनेकांना खात्री होती. पाऊस असल्यामुळे कुणालाच बाहेर पडता येत नव्हते... सुदैवाने या विजेच्या तांडवात कोणी सापडले नाही... कुठलीच जीवित हानी झाली नाही... यंदे यांच्या घराच्या उजव्या




आणि डाव्या बाजूला राहणारे दोन्ही घरांमधील इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे शॉट झाली. यंदे यांच्या घरातील टीव्ही, फ्रिज आणि इतर इलेक्ट्रिकल उपकरणे बंद पडली. बाजूला राहणारे मंडळ अधिकारी गुलाबराव गवई आणि कुलदीप पवार यांनाही वीजेचा फटका बसला आहे.. शोभाताई यंदे आणि आशाताई गवई यांनी आपापल्या घरातून वीज पडताना प्रत्यक्ष पाहिली. गुड इव्हिनिंग सिटीशी बोलताना यांनी सांगितले की जवळपास पंधरा फूट लांब आणि आठ ते दहा फूट रुंद असा भला मोठा जाळ झाला... डोळे दिपवणारा प्रकाश आणि त्यातून पडणाऱ्या ठिणग्या पाहतांना अत्यंत घाबरलो होतो... त्यात प्रचंड आवाजाने धडकी भरली होती, या शब्दांत प्रत्यक्षदर्शींनी घटनेचे वर्णन केले. वीज कोसळल्यानंतर यंदेंच्या घराकडे अनेकांनी धाव घेतली. जीवित हानी झाली नसल्याने सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. तीन ते चार घरांमधील इलेक्ट्रिक उपकरणांचे झालेले नुकसान पाहून महावितरण कंपनीने भरपाई द्यावी, अशी मागणी नागरिकांची आहे.

## कळंबेश्वर प्रकरणातील आरोपींवर कारवाई करावी या मागणीसाठी बेमुदत आमरण उपोषण

**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** कळंबेश्वर प्रकरणातील आरोपींना अटक करावी व आरोपींना पाठीशी घालणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी या मागणीसाठी गजानन नेमाडे व त्यांच्या सोबत इतरांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उप-षेण सुरू केले आहे. लहुजी शक्ती सेनेच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांना याबाबत निवेदन देण्यात आल आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, मेहकर तालुक्यातील कळंबेश्वर येथे गजानन नेमाडे हे आले होते त्यांच्या वर कटकारस्थान करून हल्ला करण्यात आला व त्यांना जातीवाचक शिविगाळ करण्यात आली. पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला परंतू पोलिसांनी तीन आरोपी विरूध्द कारवाई केली आहे. उर्वरीत आरोपी फरार आहे. त्यामुळे त्यांना अटक करावी पाठीशी घालणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर गजानन नेमाडे, शुभम नेमाडे, अमोल नेमाडे यांच्यासह इतरांची स्वाक्षरी आहे.

## भाजपा युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निलेश मुठ्ठे

**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या उपजिल्हाध्यक्ष पदी निलेश मुठ्ठे यांची निवड करण्यात आली असून ११ सप्टेंबर रोजी कॅबिनेट मंत्री संजय सावकार यांच्याहस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी आ. चैनसुख संचेती, आ. श्वेता महाले , भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे, माजी आमदार तोताराम कायंदे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संतोष काळे, दत्ता पाटील, अनंता शिंदे, चंद्रकांत बर्दे, मंदार बाहेकर, विनायक भाग्यवंत, अरविंद होंडे आदी उपस्थित होते. पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्णपणे पार पाडून, जिल्हाभरात युवा कार्यकर्त्यांचे संघटन उभे करणार असल्याची ग्वाही नवनियुक्त उपाध्यक्ष निलेश मुठ्ठे यांनी दिली. त्यांचा दांडगा जनसंपर्क व समाजकार्यातील तत्पर योगदानामुळे त्यांच्यावर ही जबाबदारी देण्यात आली. पक्षाच्या धोरणांचा प्रचार प्रसार आणि संघटनात्मक वाढीसाठी महत्त्वाची जबाबदारी आल्याने निश्चितपणे कामातून विश्वास सार्थ ठरवेल, अशी भावना निलेश मुठ्ठे यांनी व्यक्त केली.



## जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक

**खामगाव, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग** आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका यांच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुका प्रत्येक राजकीय पक्षासाठी अत्यंत महत्तवाच्या आहेत. कार्यकर्त्यांसाठी असलेल्या या निवडणुकांना सर्व शक्तीनिशी सामोरे जावुन उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणुन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेंच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकविण्यासाठी संकल्प घ्या असे आवाहन माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची तयारी करण्याच्या उद्देशाने रविवार दि.१४ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय गांधी चौक खामगाव येथे खामगाव विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सर्कलनिहाय आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. यावेळी खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुभाष पेसोडे,बाजार समितीचे लायसन कमिटीचे सभापती विलाससिंग इंगळे, बांधकाम समिती सभापती गणेश ताठे,संचालक श्रीकृष्ण टिकार, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख,मनोज वानखडे,जयराम मुंडाले,निळेगाव ग्राम



पंचायतचे माजी सरपंच गणेश पाटील,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे रोहित राजपुत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की, उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सर्वधर्म समभाव मानणारा धर्मनिरपेक्ष पक्ष आहे. पक्षाचे सर्वेसर्वा ना.अजितदादा पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री असुन अनेक महत्वाची खाती सुध्दा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आहे त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी आणून प्राध्यान्य क्रमाने मतदार संघातील जनतेच्या समस्या सोडविल्या जातील. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेंच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व मित्र पक्षाचा झेंडा फडकविण्याच्या दृष्टीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आप-आपल्या भागातील जनतेचे प्रश्न हाती घेऊन ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावे. कार्यकर्त्यांनी लोकांच्या सुख दुःखामध्ये सहभागी व्हावे. या बैठकीला सुटाळा खु.चे सरपंच निलेश देशमुख,घारोड ग्राम पंचायतचे सरपंच वैभव ठाकरे,काळेगावचे माजी सरपंच विलास इंगळे, संतोष इंगोले, पुरुषोत्तम भोसले,सुनिल पाटील, दयालसिंग पवार,संजय लाहुडकार, ईश्वरसिंग राणा, श्रीकांत वानखडे, पुरुषोत्तम शेजोळे, मनिष तिवारी, ललीत तांगडे,अजय खोद्रे, अल्ताफ खान, श्रीकृष्ण भोसले, गोपाल क्षिरसागर, पवन डवंगे, विकास गवळी, दिनेश इंगळे, प्रकाश डवंगे, त्र्यंबक इंगळे,प्रमोदसिंग राजपुत,दामोदर पाटील, निलेश टिकार, अवधुत टिकार, सुरेश बावस्कर, जनार्दन मोरे, पुरुषोत्तम कुटे, कैलास राऊत,महेश राजपुत,मंगेश बायस्कर,वैभव वानखडे, धम्मपाल हिवराळे, लक्ष्मण चव्हाण, राजेंद्र डवंगे, संजय कदम, जुलालसिंग पवार, संतोष शेगोकार, अजय राजपुत, राहुल परकाळे, बाबुराव वनारे, नासीर खॉ पठान, शेख फयाज, फरहान देशमुख,मनोहर बदरखे, मनोहर नाईक, दशरथ खंडारे,गणेश टाले,पंकज भुसारी यांच्यासह घाटपुरी-टेंभुर्णा जिल्हा परिषद,अटाळी-पळशी जिल्हा परिषद सर्कल, सुटाळा-वाडी जि.प.सर्कल मधील राष्ट्रवादी कॉग्रेसचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## ओबीसी समन्वय समितीच्या बुलढाणा एक दिवसीय धरणे आंदोलन

**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** ओबीसी समन्वय समिती बुलढाणा यांच्या वतीने दिनांक १५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. प्रगत मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात सामावून घेऊ नये तसेच



गॅझेटीर नुसार च्या जीआरमुळे ओबीसी समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून समाजाचा हक्क हिरावला जात असल्याची भावना जनमानसात निर्माण झाली आहे. तो ओबीसीवर अन्याय करणारा अध्यादेश तात्काळ मागे घेऊन ओबीसीमध्ये शासनाने २ सप्टेंबर रोजी काढलेला जीआर तातडीने रद्द करावा, या प्रमुख मागणीसह ओबीसी महामंडळाकडून थेट ५ लाख कर्ज रुपये देण्यात यावेत ओबीसी जातिनिहाय जनगणना व न्या रोहिणी आयोग लागू करण्यात यावा . वरील मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री यांना देण्यात आले या आंदोलनात जिल्ह्यातील ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. शासनाच्या अन्यायकारक धोरणांविरोधात घोषणाबाजी करत समाजबांधवांनी आपला तीव्र रोष व्यक्त केला.

ओबीसी समाज समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, मराठा समाजाच्या महामंडळाला हजारो कोटी रुपयांचा निधी मिळतो, मात्र ओबीसी महामंडळाला तुटपुंजा निधी देऊन थातूर-मातूर मदत केली जाते. ओबीसी प्रवर्गात तब्बल ३७६ पेक्षा जास्त जाती आहेत. एवढ्या मोठ्या समाजघटकाला न्याय मिळणे अपेक्षित असताना शासन सातत्याने ओबीसींवर अन्याय करत आहे. २ सप्टेंबरच्या हैदराबाद होणारी जबरजस्तीची घुसखोरी थांबली पाहिजेत या व इतर मागण्यांसाठी हे धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे आयोजन ओबीसी समाज समिती बुलढाणा समन्वय समितीचे निमंत्रक सतीश शिंदे, प्रा सदानंद माळी यांनी केले होते. आंदोलनामध्ये दामोदर बिडवे प्रदेश उपाध्यक्ष बारा बलुतदार महासंघ, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष संतोष खांडेभराड, समता परिषदेचे राज्य सल्लागार, प्रा.सदानंद माळी सर, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विजय खरात गुरव समाजाचे जिल्हाध्यक्ष गोपाल सोनटक्के, सुतार समाजाचे जिल्हाध्यक्ष अनंत राऊत, लोहार समाजाचे नेते प्रकाश सुरडकर, शिवसेना नेते, श्रीराम झोरे, विजय जागृत, प्रकाश सपकाळ, सुनील शेजुळकर, समाधान जंजाळकर, प्रवीण भुतेकर, विजय भुतेकर, डॉ.विजय खोलाडे, विनोद खोलगडे, एकनाथ खानजोडे, राजेश इंगळे, नारायण जाधव, भास्कर पंडित, अरविंद खांडेभराड इतर असंख्य ओबीसी बांधवांची उपस्थिती होती.

## जिल्हा स्तरीय रायफल शुटिंग स्पर्धा संपन्न

**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्हास्तरीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धा ११,१२,१३ सप्टेंबर रोजी क्रीडा व युवक सेवा संचालनाय, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा व जिल्हा क्रीडा परिषद बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने व हा-लेलुया शूटिंग रेंज यांच्या तांत्रिक सहकार्याने पार पडल्या. शूटिंग कोच संजीव अरविंद यंगड यांनी व सहकारी कोच प्रज्ञा लहाने यांनी पंच म्हणून काम पाहिले. १३ सप्टेंबर ला बक्षीस वितरण समारंभ पार पडला. आंतरराष्ट्रीय पदक विजेता



मिहिर नितीन अपार यांना बक्षीस वितरणासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी. गुळवे सर, काचवाल सर, भारत चीरखे सर, कोल्हे सर, असे अनेक मान्यवर व क्रीडा शिक्षक तसेच पालक उपस्थित होते. प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांमध्ये (ओपन साईट रायफल) अमित विनोद गिरी, उत्कर्ष अनिल बाहेकर, समीक्षा शिरसाट, स्नेहा अरुण पडोळ, पृथ्वीराज निंबाजी साळोख, प्रथम (पीप साईट रायफल), अद्वैत अभिजीत वडाळकर, सृष्टी सुचेत देशमुख, रुद्र भारत चिरखे, श्रुती संतोष मोर, शेख फैजान, श्रद्धा किशोर कुटे प्रथम (एअर पिस्टल), शौर्या प्रवीण बाहेकर, श्रीतेज सचिन देशमुख, हर्ष फिलिप डोंगरदिवे, आरुषी नितीन अपार, अश्विनी राम कदम, हर्ष शरदराव बकाल द्वितीय (ओपन साईट रायफल), श्रेयस विनोद सावळे, प्रीत संजीव यंगड, दिव्या सुधाकर ठाकरे. द्वितीय. (पीप साईट), सन्मित सौरभ सराफ, नितीक्षा विनोद झाल्टे, संचित जयदीप ताठे, ख्रिस्तीना शिमोन समुद्रे, ओम अनिल सीताफळे द्वितीय (एअर पिस्तल), खुशी संतोष काठवते, शेख अयान शेख जफर, सोनाक्षी सुधाकर शेळके, पुनम रामप्रसाद कोल्हे, तेजस सुरेश गवइ तृतीय (ओपन साईट रायफल), तेजस सुरेश गवई, हर्षवर्धन अमोल तिडके, रेवती गजानन नखोद, रितिका मुकेश कडू. तृतीय (पीप साईट), वेद गणेश सराफ, स्पर्शा सचिन गायकवाड, भीमवंश बाळू भिसे. तृतीय (एअर पिस्तूल), श्रावणी शरद भगत, राधिका ज्ञानेश्वर इंगळे या सर्व विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त करून विभागीय स्तरावर मुसंडी मारलेली आहे.

# व्हॉट्सॲपवर येत आहेत फेक मॅसेज

## मोबाइल हॅकिंगपासून खबरदारी घेण्याचे एसडीपीओ मनीषा कदम यांचे आवाहन



**सिंदखेड राजा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** अलीकडे एसबीआय योनो नावाने एसएमएस / व्हॉट्सअप /अन्य मॅसेजेस पाठवून नागरिकांना आर्थिक व वैयक्तिक माहितीची मागणी करणाऱ्या फिशिंग स्कॅमचे अनेक प्रकार उदयास आले आहेत. या प्रकारातील मॅसेजेसमध्ये असलेले लिंक, ॲप डाउनलोड सूचना आणि ओटीपी मागण्याचा प्रयत्नामुळे मोबाईलवरील बँक खाते, ईमेल, व्यक्तीगत माहिती देणे धोकेदायक पडू शकतात. त्यामुळे मोबाइल हॅकिंगपासून खबरदारी घ्यावी, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी मनिषा कदम यांनी केले आहे. अशा मॅजेवर आलेल्या अज्ञात लिंकवर कधीही क्लिक करू नका, जर मेसेजमध्ये ऐसी लिंक असेल की आपले खाते अपडेट करावा लागेल, ओटीपी नंबर द्यावा लागेल इत्यादी, ती लिंक खोटी असू शकते. ओटीपी, पासवर्ड, लॉगिन डिटेल्स कधीही शेअर करू नका, बँक किंवा बँकेचे अधिकृत अधिकारी कधीच मेसेज/कॉलद्वारे ओटीपी, पासवर्ड किंवा खात्याची लॉगिन माहिती मागत नाहीत, ॲप्स फक्त अधिकृत स्रोतांमधूनच डाउनलोड करा, प्लेस्टोअर / ॲप स्टोअर किंवा एसबीआयची अधिकृत वेबसाइट यांच्याच माध्यमातून ॲप डाउनलोड वा अपडेट करा. बाह्य एपीके किंवा अस्थायी ॲप्स पासून दूर रहा, मोबाईलमध्ये ॲंटीव्हायरस सॉफ्टवेअर वापरा मोबाइल डिव्हा-इसला वायरस/मालवेयरपासून सुरक्षित ठेवणारे ॲंटीव्हायरस ॲप अपडेटेड घटना आढळल्यास त्वरित तक्रार करास्थानिक पोलीस स्टेशन / सायबर पोलीस विभाग यांच्याकडे संपर्क करण्याचे आवाहन मनिषा कदम यांनी केली आहे. त्यामुळे नागरिकांनी खबरदारी घ्यावी व अशा गोष्टीला बळी पडू नाही.

## मोबाइल हॅकिंगपासून खबरदारी घेण्याचे एसडीपीओ मनीषा कदम यांचे आवाहन

# खोटी सही व शिक्क्यांचा गैरवापर करणारे दोन सेतू केंद्र बंद




**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** नागरिकांना शासकीय प्रमाणपत्रे सुलभ व कमी खर्चात उपलब्ध व्हावीत तसेच बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळावी या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेल्या सेतू केंद्रांवर गंभीर गैरप्रकार उघड होत आहेत. नियमांचे उल्लघंन करून खोटी सही व शिक्क्याचा गैरवापर केल्याचे चौकशी अंती उघडकीस आल्यामुळे बुलढाणा तालुक्यातील दोन सेतू केंद्र कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी आदेश दिले आहेत.

माळविहीर येथील गणेश श्रीकृष्ण गुंडकर हे बुलढाणा शहरातील सरकारी दवाखाना मार्गावरील झेरॉक्स सेंटरमध्ये सेतू केंद्र चालवत होते. येथे बनावट शिक्के वापरून आणि नायब तहसीलदारांची खोटी सही करून भाडेपट्टयाचे खोटे दस्त तयार केल्याची तक्रार तहसीलदार विठ्ठल कुमरे यांच्याकडे नोव्हेंबर २०२४ मध्ये दाखल झाली होती. चौकशीत बुलढाणा तहसील कार्यालयातील कोणत्याही नायब तहसीलदाराने अशा कागदपत्रांवर सही केली नसल्याचे तपासणीत स्पष्ट झाले. दुसऱ्या प्रकरणात बिरसिंगपूर येथील विकास शिंदे या सेतू केंद्र चालकाने आपले केंद्र मूळ ठिकाणी न चालवता बुलढाणा येथेच सुरू केले होते.

त्याने स्वाधार योजनेसाठी अर्ज भरण्याच्या बदल्यात ५०० रुपये घेतल्याची तक्रार प्राप्त झाली होती. चौकशीत त्याने अनेक नियमांचा भंग केल्याचेही उघड झाले. प्रकरणी या दोन्ही गंभीर प्रकरणांची चौकशी पूर्ण केल्यानंतर एसडीओ शरद पाटील यांनी १२ सप्टेंबर रोजी दोन्ही सेतू केंद्रे कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

# बुलढाणा आर्किटेक व इंजिनियर्स असोसिएशनची कार्यकारणी गठीत



**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जन्मदिवसानिमित्त बुलढाणा आर्किटेक व इंजिनियर्स असोसिएशन तर्फे १५ सप्टेंबर रोजी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांना अभिवादन करण्यात आले. शासकीय विश्रामगृहावर आयोजित या कार्यक्रमाला असोसिएशनचे माजी अध्यक्ष नितीन राठोड, दिलदार पठाण, प्रकाश लहासे व इतर बुलढाणा शहरातील सर्व इंजिनियर्स आणि आर्किटेक बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमात अभियंता दिनाचे औचित्य साधून बुलढाणा शहरात स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रात काम करत असलेल्या रविराज राठोड, दीपक वैष्णव, वैभव लाड, आदित्य चौधरी, हार्दिक चौधरी व इतर सर्व अभियंत्यांचे सत्कार करण्यात आले. तसेच बुलढाणा शहराची नवीन आर्किटेक व इंजिनियर्स असोसिएशनची कार्यकारणी गठीत करण्यात आली त्यामध्ये अध्यक्ष पदी सुरेश चौधरी, उपाध्यक्ष रविराज राठोड, कोषाध्यक्ष पदी वैभव लाड, सचिव पदी संतोष लहासे, सहसचिव पदी दीपक वैष्णव यांची निवड सर्वानुमते सर्वांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली.

# पाकिस्तानविरुद्ध 'माझं कुंकू, माझा देश' आंदोलन

**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात उघडकीस येऊनही केंद्र सरकार बीसीसीआयला पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळण्याची परवानगी देत असल्याच्या दुटप्पी भूमिकेविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीच्या वतीने आज बुलढाणा शहरात तीव्र आंदोलन करण्यात आले. माझं कुंकू, माझा देश या घोषणांनी संगम चौक परिसर दणाणून गेला. जिल्ह्यातील महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पाकिस्तानविरोधात संताप व्यक्त करत केंद्र सरकारच्या 'देशविरोधी धोरणांचा' निषेध नोंदवला. हे आंदोलन शिवसेना प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. आंदोलनावेळी त्यांनी सांगितले की, ज्यांच्या हातून देशातील जवानांचा बळी जात आहे, अशा पाकिस्तानशी संबंध ठेवणे म्हणजे शहीदांचा अपमान आहे. केंद्र सरकारने बीसीसीआयला पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळण्याची दिलेली परवानगी देशद्रोहाला प्रोत्साहन देणारी आहे. आंदोलनादरम्यान महिलांनी सरकारला प्रतीकात्मक स्वरूपात कुंकू पाठवून आपल्या भावना व्यक्त केल्या.




यावेळी महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख विजयाताई खडसान, उपजिल्हाप्रमुख प्रतीक्षाताई पिंपळे,तालुका संघटक रुपालीताई चौधरी, शहर प्रमुख लक्ष्मीताई बकटवार, रत्नाताई शेळके, अर्चनाताई शेळके, गोदाताई काळे,कडुबाई भागिले, सुमनबाई, शोभाताई रिंढे, ताराबाई रिंढे, दुर्गाबाई रिंढे, लताबाई रिंढे, ताराबाई खरे, अनुष्का जाधव, स्मिता वराडे, सोनाली वाघ, उषा साळोक, शालिनी जाधव, स्वाती जाधव, सुवर्णा जाधव, सुनिता सुरडकर, बेबी परिहार, वैशाली भुसारी, सुनीता दराखे, वैशाली मिसाळ, शारदा दाभाडे, जयश्री राऊत, रुक्मिणी शिरसाट, मीना इंगळे, ज्योती नलावडे,मीनाताई गव्हाणे, पूजा शिंगणे, शितल सुरडकर, पूजा शेळके यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

# मादणी परिसरात जोरदार पाऊस

**मेहकर, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील मादणी आणि डोणगाव परिसरात १५ सप्टेंबरच्या संध्याकाळी मुसळधार पावसाने दाणादाण उडविली. सायंकाळी ५ वाजताच्या दरम्यान मादणी शिवारात ढगफुटीसदृश पाऊस कोसळला. या अचानक आलेल्या पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. विशेषतः दसऱ्यानिमित्त केलेल्या फुलशेतीसह सोयाबीन, कपाशी या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पावसामुळे लेंडी नाल्याला अचानक पूर आला. यावेळी शेतातून परतत असलेले दत्ता धुडकेकर हे शेतकरी नाल्यात वाहून जात असतानाच तेथे उपस्थित असलेल्या शे. कलीम, परमेश्वर बाजड, फिरोज खान, शे. रफिक शे. मुनाफ या युवकांनी धाडस करून त्यांना बाहेर ओढत त्यांचा जीव वाचविला. दरम्यान, जुन्या मादणीतील मारुती मंदिरात दर्शनासाठी गेलेले भाविक अडकून पडले होते. पूर सल्यानंतर त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

# लध्दड अभियांत्रिकीत आंतरराष्ट्रीय साक्षरता सप्ताह

**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** पंकज लद्धड इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलोंजि अँड मॅनेजमेंट स्टडीज येळगाव, येथे ११ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहानिमित्त महाविद्यालयातील रा. से. यो. स्वयंसेवकांनी एक वेगळा उपक्रम राबवून समाजात एक वेगळा संदेश दिला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात कार्यरत असलेल्या सफाई कर्मचारी ज्या मद्ये प्रामुख्याने महिलांचा समावेश असून त्यांना या उपक्रमादरम्यान इंग्रजित लिहिण्याचे, वाचण्याचे प्राथमिक प्रशिक्षण देण्यात आले. विध्यार्थ्यांच्या या प्रयत्नामुळे सफाई कर्मचारी महिलांना इंग्रजितील अक्षरे ओळखता आली, तसेच काही सोपे शब्द लिहिण्याचा सराव सुद्धा घेण्यात आला. या उपक्रमादरम्यान महाविद्यालयाचे रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.भरत पवार, प्रा.गणेश गुंड, प्रा.रुचिरा आगलावे, प्रा.प्रिया मोरे व विध्यार्थी प्रतिनिधी साक्षी देशमुख, सुदर्शन गंडे, यश देशमुख, कर्मचारी व इतर शिक्षक यांच्या अंतर्गत हा कार्यक्रम राबविण्यात आला, सदर कार्यक्रमास प्रा. एस.एम. दांडगे संस्थेचे अध्यक्ष डॉ.दीपक लद्धड, संस्थेचे सचिव डॉ.संगीता लद्धड , संस्थेचे उपाध्यक्ष रवींद्र लद्धड, संस्थेचे कोषाध्यक्ष अर्चना लद्धड तसेच संस्थेचे उपसचिव डॉ.ध्रुव लद्धड यांनी कौतुक केले.



# विवाहितेस मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

**खामगाव, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** पावसात छत्री वापरल्याच्या कारणावरून सासू आणि पतीने मारहाण केल्याची घटना सुटाळा बु (ता. खामगाव) येथे घडली आहे. या प्रकरणी पीडित विवाहितेने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, पती व सासूविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पूजा अमोल रायपुरे (२९) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १४ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता पाऊस सुरू असल्याने त्यांनी घरातील छत्री वापरण्यास घेतली. यावरून सासू रंजना गजानन रायपुरे यांनी 'छत्री कशाला घेतली,' असे म्हणत शिवीगाळ केली व मारहाण केली. त्यानंतर पती अमोल गजानन रायपुरे यांनीही शिवीगाळ करत मारहाण केली.

# गोदरी मल्हार वाडी नजीक पाझर तलाव धोक्यात; भिंतीला तडे

**चिखली, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :**



तालुक्यातील गोदरी मल्हार वाडी शेजारील जुना पाझर तलाव सध्या गंभीर संकटात सापडला आहे. मुसळधार पावसामुळे तलाव ओसंडून भरला असून तलावाच्या भिंतीला मोठमोठे तडे गेले आहेत. या तड्यांमुळे भिंत कधीही फुटण्याची भीती निर्माण झाली असून परिसरात भीतीचे वातावरण आहे. तलावाच्या बाजूलाच गोदरी गावातील वीस ते पंचवीस घरांची लोकवस्ती आहे. भिंत फुटल्यास या लोकवस्तीला थेट धोका असून नागरिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय तलावाचे पाणी जर फुटले तर त्याचा प्रवाह थेट चांधई गाव व चिखली शहरातून वाहणाऱ्या जांबुवती नदीत मिळणार आहे. त्यामुळे नदीकाठच्या घरांमध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणात हानी होऊ शकते. विशेष म्हणजे, मागील वर्षी या तलावाच्या भिंतीला तडे गेल्याचे ग्रामस्थांनी प्रशासनाला निवेदन देऊन लक्ष वेधले होते. परंतु त्या वेळी पावसाचे प्रमाण कमी असल्याने प्रशासनाने दुर्लक्ष केले. मात्र यंदा मुसळधार पावसामुळे तलाव पूर्ण भरून परिस्थिती गंभीर झाली आहे. तसेच याच परिसरातील गोदरी बारी वाडी येथील तलावही पूर्ण भरलेला आहे. जर पाझर तलाव फुटला तर त्याचा थेट परिणाम या तलावावर होऊन तोही फुटण्याचा धोका संभवतो. यामुळे चांधईसह चिखली शहरासाठीही गंभीर संकट निर्माण होऊ शकते. ग्रामस्थांनी प्रशासनाला तात्काळ उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. तलावाच्या भिंतीवरील तडे दुरुस्त करणे, भिंतीवर व परिसरात मोठ्या प्रमाणावर वाढलेली झाडे-झुडपे हटवणे आणि संरक्षणात्मक कामे तातडीने सुरू करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

जर प्रशासनाने तातडीने लक्ष दिले नाही, तर कधीही मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# विदर्भ महाविद्यालयात गृह अर्थशास्त्र व इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन

**बुलढाणा, १६ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्थानिक विदर्भ महाविद्यालय बुलढाणा येथे १३ सप्टेंबर रोजी इतिहास व गृह अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. वर्षा सरसांडे (असोसिएट प्रोफेसर आयुर्वेद महाविद्यालय बुलढाणा, ) होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री वैशालीताई तायडे उपस्थित होत्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद गायकी सर होते जिजाऊ च्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाला सुरुवात झाली कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविका मध्ये प्रा. सीमा सोनोने यांनी गृहअर्थशास्त्र विषयाचे महत्त्व प्रतिपादन करून अभ्यास मंडळाच्या स्थापने मागची भूमिका स्पष्ट केली तर, इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.संगीता पवार यांनी इतिहास विषयात विद्यार्थ्यांना आवड निर्माण होण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी कशा प्रमाणे केली जाते याबद्दल माहिती सांगितली. तसेच कार्यक्रमाच्या उद्घाटक डॉ.वर्षा सरसांडे यांनी महाविद्यालयीन मुलींना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देऊन कौशल्यांचा विकास करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास हा विषय अत्यंत उपयुक्त आहे असे प्रतिपादन केले. प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित असलेल्या वैशालीताई तायडे यांनी इतिहासातून अनेक गोष्टी शिकायला मिळतात त्यातूनच भविष्य घडते असे मत व्यक्त करत या संदर्भात विविध दाखले




दिले. शेवटी अध्यक्षीय भाषणात प्राचार्य गोविंद गायकी सर यांनीआजच्या काळातील धकाधकीच्या जीवनशैलीमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत चालले आहे त्यामुळे योग्य आहारासोबत मानवाला योगा व व्यायामाची सातत्याने गरज भासते. हे सांगून गृह अर्थशास्त्र व इतिहासाच्या माध्यमातून विविध कार्यक्रम राबवण्याचे आश्वासन दिले. व दोन्ही अभ्यास मंडळाचे कार्यकारिणी जाहीर केली. याप्रसंगी सन २०२४/२५ मध्ये झालेल्या विद्यापीठीय परीक्षांमध्ये गृह अर्थशास्त्र विषयांमध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थिनीचा सत्कारही घेण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहिल जाधव यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रतीक्षा बिल्लारी ने केले कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उप-स्थित होते.

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City
हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAHMAR/2012/46689